SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.–416 004, महाराष्ट्र
दूरध्वनी2690571, 2693643, 2693730
परीक्षा नियत्रंक कार्यालय दूरध्वनी: 2693176, फॅक्स: 0231&2690655
इतर परीक्षा–2 विभाग विस्तारित दूरध्वनी 2609120 FAX: 0091-0231-2691533 & 0091-0231-269233

Estd: 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28TH Rank

**Ref.:No. /SU/O.E.1/2/3/4/EXAM/M.A./1105** **Date : 26 -03-2017**

## <u>अत्यंत महत्वाचे परिपत्रक</u>

प्रति,
मा. अधिविभागप्रमुख / मा. संचालक
<u>अधिविभाग / केंद्र / दूरशिक्षण</u> केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर 416 004

प्रति,
मा. संचालक / मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय – मार्च, 2018 च्या परीक्षेसंबंधित महाविद्यालयांनी / अधिविभागांनी / दूरशिक्षण केंद्राने घ्यावयाच्या दक्षतेबाबत.**

**संदर्भ – Ref.:No. /SU/EXAM/O.E.1/ON EXAM/270, Date : 11-Jan 2018**

**महोदय / महोदया,**

**ऑक्टों. / नोव्हें., 2017 च्या सत्रातील होणा–या परीक्षेच्या बाबतीत <u>महाविद्यालयांनी / अधिविभागांनी / दूरशिक्षण केंद्रांनी</u> परीक्षा अर्ज भरण्याबाबत वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.**

### अ. परीक्षा अर्ज भरल्यानंतर ऑनलाईन प्रणालीतील खालील कार्यवाही करणेबाबत :–

1. सर्वांनी विद्यार्थ्यांची ऑनलाईन प्रणालीतून नेमलिस्ट, समरी जनरेट करून घेणे. याप्रमाणे सर्व परीक्षेची कार्यवाही – परीक्षा घेणे, टर्मवर्क ऑनलाईन भरणे, निकाल इ. सर्व कार्यवाही करावयाची आहे. तसेच जे विद्याथी एम.के.सी.एल प्रणालीतील आहेत. त्यांची यादीही मॅन्युअली आपल्या विभागात / महाविद्यालयात / केंद्रात तयार ठेवणेची आहे.

2. सर्वांनी ऑनलाईन प्रणालीत आपली समरी तपासणेही गरजेचे आहे. आपल्याकडे अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थी संख्या व त्यांनी निवडलेले विषय, यावरून सर्वांनी समरी तपासणे गरजेचे आहे. समरीमध्ये जर एखाद्या अभ्यासक्रमातील विषय किंवा विषय वार असणारी विद्यार्थी संख्या यामध्ये काहीही त्रुटी आढळल्यास तात्काळ संबंधित परीक्षा विभागाशी संपर्क साधावा.

3. क्रिडा स्पर्धामध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा निर्धारित वेळापत्रकानंतर घेतल्या जातात. त्यासाठी महाविद्यालयाकडून स्वतंत्र प्रस्ताव मागविला जातो. सदर प्रस्ताव पाठविताना विद्यार्थी स्पर्धेला जाण्यापूर्वी योग्य नमून्यात अर्ज सादर करावा. तसेच विद्यार्थ्यांनी त्या परीक्षेसाठी निवडलेले विषय, ज्या विषयांची परीक्षा द्यावयाची आहे ते विषय व त्या विषयांचे कोड, महाविद्यालयाचे नाव, सेंटरचे नाव, पीआर एन नं. , बैठक कं., खेळाचा कालावधी इ. आवश्यक योग्य ती माहिती संबंधित विभागास देणेत यावी. खेळाडूं विद्यार्थ्यांचे एकदा परीक्षेचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर खेळाडू विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत किंवा परीक्षा पून्हा घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. त्यामुळे विहीत वेळेत सदर अर्ज पाठविण्याची दक्षता घ्यावी.

4. दिव्यांग विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या Letter regarding facilites to Divyang students दि. 09 - 02 – 2018 च्या पत्राप्रमाणे संधीचा योग्य तो लाभ देणेत यावेत. तसेच अ”ाा दिव्यांग विद्यार्थ्यांची माहिती भरून परीक्षा सुरू होण्याच्या पूर्वी 1 महिना अगोदर विद्यापीठात संबंधित विभागात जमा करावेत. जेणेकरून सदर विद्यार्थ्यांना त्यांना उपलब्ध असणा–या गुणांतील /इतर संधी इ. विद्यापीठ नियमांचा लाभ देता येईल. **सदर विद्यार्थ्याच्या सोयी बाबतीतील सर्व माहिती/सूचना आपल्या स्तरावर सत्र सुरू होण्यापूर्वीच महाविद्यालयांनी/अधिविभागांनी सदर विद्यार्थ्यांना देणेत याव्यात.**

5. परीक्षा अर्ज भरताना अनेक विद्यार्थ्याचे विषय चुकीचे निवडले जातात, किंवा तांत्रिक कारणास्तव सदर विषय निवडले जात नाहीत. तरी अशा विद्यार्थ्यांचे हॉलतिकीटवर चुकीचे विषय येतात. याकरीता सदर विद्यार्थ्यांना सुचना करावेत की, ज्यांचा परीक्षा अर्ज भरताना अशा चुका झालेल्या आहेत किंवा तांत्रिक अडचणी आलेल्या आहेत. अशा विद्यार्थ्यांची दुरूस्ती करून, चेकलिस्ट काढून त्यामध्ये विषय जर चुकीचे दाखवत असतील, तर ते तात्काळ दुरूस्त करावेत.

**ब. टर्मवर्क/प्रॅक्टीकल/सत्रकर्मचे गुण भरण्यासंबंधीच्या सूचना – टर्मवर्कच्या गुणामध्ये यापुढे कोणताही बदल केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच यासंदर्भात महाविद्यालयाने/अधिविभागाने/केंद्राने कोणताही पत्रव्यवहार करू नये. ऑनलाईन याद्या देण्यापूर्वी खालील बाबींची दक्षता घेणेत यावी.**

1. टर्मवर्कचे व प्रॅक्टीकलचे गुण भरण्यासाठी संगणक प्रणालीची लिंक सुरू झाल्यानंतर विहीत मुदतीतच भरून, तपासूनच विद्यापीठांतील संबंधित विभागाकडे जमा करावयाचे आहेत.

2. तांत्रिक अडचणीमुळे एखादया विषयाचे गुण प्रणालीत भरताना अडचण आल्यास तात्काळ ऑन विभाग व आय. टी विभागाशी ई–मेलव्दारे अथवा फोन व्दारे (0231–2609335) संपर्क साधावा. सदर गुण ऑनलाईन सिस्टीममधिल तांत्रिक कारणास्तव जर भरले गेले नाहीत, तर तात्काळ लिंक उपलब्ध असेपर्यंत परीक्षा विभागात येवून सदर गुण भरणेचे आहेत. तद्नंतर कोणत्याही परिस्थितीत लिंक सुरू करून दिली जाणार नाही.

3. विहीत मुदतीनंतर/ऑनलाईन प्रणालीची लिंक बंद झाल्यानंतर गुण भरल्यास, सदर गुण भरलेले दिसतात. परंतु निकालाच्या वेळी सदरचे गुण लेजरला येत नाहीत. सदर विद्यार्थ्याचा अशा विषयांना निकाल अबसेंट जाहीर होतो.

4. काही विद्यार्थ्यांचे निवडलेला विषय वेगळा असतो व त्यांचे टर्मवर्कचे मार्क दुस–यांच विषयांना भरले जातात. तरी परीक्षा अर्जात जो विषय निवडला असेल, त्याच विषयांना टर्मवर्क/प्रात्यक्षिकचे मार्क भरण्यात यावेत.

5. टर्मवर्कचे गुण भरताना विद्यार्थी Present/Absent असताना अनुक्रमे Absent/Present केले जातात. अशा अबसेंट विद्यार्थ्यांस गुण दिले जातात. निकालानंतर त्याबद्दल बदलांसाठी विचारणा केली जाते. तरी याद्या तपासूनच देणेत याव्यात.

6. जून्या किंवा सुधारित अभ्यासक्रमातील ज्या गुणदान पध्दती असतील त्याप्रमाणेच गुणदान करणेत यावे व तसे झाले आहे का? याची खात्रीही करावी. तसेच ज्या सिस्टीम मध्ये तो अभ्यासक्रम असेल त्याच सिस्टीम मध्ये टर्मवर्क भरावेत.

7. एम.के.सी.एल प्रणालीतील सदर गुणांबाबत जर ऑनलाईन सिस्टीम उपलब्ध करून दिलेस त्यामध्ये गुण भरावेत. अथवा काही तांत्रिक कारणास्तव गुण भरण्याकरीता लिंक /सिस्टीम उपलब्ध न झाल्यास, फक्त अशाच विद्यार्थ्यांचे गुण मॅन्युअली स्विकारले जातील, तसेच सदर गुण सिस्टीम मध्ये घेण्यासाठी विद्यापीठामध्ये स्वतंत्र व्यवस्था केली जाईल. याची नोंद घ्यावी.

## क. पर्यवेक्षकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत :—

1. परीक्षा कार्यकालात ज्या—त्या संबंधित परीक्षक/पर्यवेक्षकांनी ऑनलाईन ॲबसेंट व प्रेझेंट रिपोर्ट भरून उत्तरपत्रिका जमा करताना, त्याची ऑनलाईन भरलेली प्रिंट मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडे जमा करावयाच्या आहेत. त्याशिवाय उत्तरपत्रिका जमा केल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

## म. निकाल जाहीर केल्यानंतर घ्यावयाच्या दक्षता —

1. काही तांत्रिक अडचणीमुळे निकालानंतरही विद्यार्थ्यांचे गुण ऑनलाईन सिस्टीमवर दिसत नसल्यास (टर्मवर्क/प्रात्यक्षिक/लेखी पेपरचे गुण ऑनलाईन फिडींग असूनही, दिसत नसल्यास किंवा विद्यार्थ्यांचा पूर्ण निकाल दिसत नसल्यास) —: शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, संकेत स्थळावर (Internet) प्रकाशित होणा—या परिणांमध्ये कोणत्याही अनावधानाने झालेल्या त्रुटीस जबाबदार नाही. संकेत स्थळावर प्रकाशित झालेले निष्कर्ष हे परीक्षार्थीना त्वरित माहिती देण्यासाठी आहेत. सदर ऑनलाईन निकाल हा केवळ सत्यापनासाठी (verification) व फक्त उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रती (Photo copy) साठी वापरू शकतो.
2. **सदर निकाल जाहीर झाल्यानंतर, निकालातील त्रुटीबाबत विद्यार्थ्यांना अर्जासह विद्यापीठात परस्पर पाठवू नये. विद्यार्थ्यांच्या त्रुटींचे सर्व अर्ज संबंधित महाविद्यालयांनी/केंद्रांनी/विभागांनी एकत्रित करावेत. ते सर्व एकत्रित अर्ज संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रासहीत संबंधित विभागात तात्काळ निकाल जाहीर झाल्यापासून 7 दिवसांच्या आत जमा करावयाचे आहेत. जेणेकरून कामाचा निपटारा जलद गतीने होईल. त्यामुळे निकाल जाहिर होताच, संबंधितांनी जाहीर झालेले निकाल विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावेत. तसेच सदर बाब पुढील परीक्षा अर्ज भरण्यापूर्वीच दुरूस्त करून घेणेची आहे.**
3. ज्या विद्यार्थ्यांच्या पात्रता अपूर्ण आहेत, त्याबाबत सर्व महाविद्यालयांनी /अधिविभागांनी दूरशिक्षण केंद्राने कोणत्याही परिस्थितीत दि. 30 एप्रिल, 2018 पूर्वी सर्व पात्रता पूर्ण करून घ्यावयाच्या आहेत. अन्यथा त्यांची सर्व जबाबदारी आपली राहील. विद्यार्थ्यांनी पात्रते संदर्भात परीक्षा विभागाशी संपर्क साधू नये.
4. परीक्षा प्रमाद, चुकीचा बैठक क्रमांक लिहणे, वेगळया शाईचा वापर, प्रश्नपत्रिकेतील चुकीचे प्रश्न किंवा गुणदान यासांरख्या अनेक प्रशासकीय कारणास्तव निकाल प्रलंबित राहीलेस, योग्य त्या पुर्ततेनंतर सदर निकाल जाहीर करणेत येईल.

**कळावे,**

**आपला विश्वासू,**

**सही/—**
**उपकुलसचिव**